# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.05.2025** **वारःशुक्रवार**

---

1. भारत आणि पाकिस्तानदरम्यान इतर कोणत्याही तिसऱ्या देशाच्या मध्यस्थीचा प्रश्नच उद्भवत नाही-परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांची स्पष्टोक्ती,
2. भारतीय विमानतळांवर सेवा देणाऱ्या सेलेबी या तुर्की कंपनीचा सुरक्षा परवाना रद्द करण्याचा निर्णय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाचा निर्णय,
3. यंदाच्या आर्थिक वर्षात भारताचा विकासदर सहा पूर्णांक तीन दशांश टक्के राहण्याचा संयुक्त राष्ट्रांचा अंदाज,
4. फरार हिरे व्यापारी नीरव मोदी याचा जामीन अर्ज लंडन उच्च न्यायालयानं फेटाळला आणि
5. खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला 158 पदकांसह सलग तिसऱ्या वर्षी विजेतेपद

**जयशंकर**

'भारत आणि पाकिस्तानदरम्यान इतर कोणत्याही तिसऱ्या देशाच्या मध्यस्थीचा प्रश्नच उद्भवत नाही', असं ठाम प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी केलं आहे. काल नवी दिल्ली इथं एका कार्यक्रमाच्या वेळी ते प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. 'पाकिस्तानशी चर्चा द्विपक्षीयच होईल, काश्मीरमध्ये पाकिस्तानने केलेलं अतिक्रमण हटवून पाकव्याप्त काश्मीर परत देण्याच्या मुद्द्यावरच होईल', असं त्यांनी स्पष्ट केलं. या संदर्भात भारताच्या भूमिकेत काहीही बदल झालेला नाही आणि या मुद्यावर कायम देशभरात सहमती आहे, असंही ते म्हणाले. अमेरिकेबरोबरच्या व्यापाराविषयी वाटाघाटी सुरु असून उभयपक्षी हिताचा तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरु असल्याचं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

**होंडूरास**

त्यापूर्वी, नवी दिल्लीतील होंडुरासच्या राजदूतावासाचं उद्घाटन डॉ. एस. जयशंकर यांच्या हस्ते झालं. भारत आणि होंडुरासमधील आर्थिक संबंध गेल्या तीन दशकामध्ये सातत्यानं वाढत अधिक बळकट झाले आहेत. त्यामध्ये द्विपक्षीय व्यापार 300 दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक झाला आहे, असं जयशंकर म्हणाले.

**जयशंकर चर्चा**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल अफगाणिस्तानचे काळजीवाहू परराष्ट्र व्यवहारमंत्री मावलवी आमिर खान मुताकी यांच्याबरोबर चर्चा केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केल्याबद्दल त्यांनी अफगाणिस्तानला धन्यवाद दिले. भारत आणि अफगाणिस्तान यांच्या दरम्यान खोटे आणि तथ्यहीन अहवाल प्रसिद्ध करत उभय देशांमध्ये अविश्वास निर्माण करण्याच्या काही देशांच्या प्रयत्नांचा जयशंकर यांनी दृढपणे निषेध केला.

**व्हान्स**

ऑपरेशन सिंदूरची जगभर प्रशंसा होत आहे. 'दीर्घ काळापासून भारतानं अशी मोहीम राबवण्याची आवश्यकता होती', असं ब्रिटीश लेखक आणि राजकीय विश्लेषक डेव्हिड व्हान्स यांनी म्हटलं आहे. पाकिस्तान हा एक अपयशी देश आणि दहशतवादी कारवायांचं माहेरघर असल्याचं मत त्यांनी एका वृत्तसंस्थेला मुलाखत देताना व्यक्त केलं. पहलगाम हल्ल्याचं वार्तांकन अनेक देशांच्या माध्यमांनी पक्षपाती पद्धतीनं केलं, असं सांगत या प्रसारमाध्यमांनी दहशतवाद्यांना केवळ हल्लेखोर असं संबोधल्याबद्दल त्यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली.

**बहिष्कार पुणे**

राष्ट्र प्रथम ही भूमिका घेत पाकिस्तान आणि तुर्कीए विरोधात ठामपणे उभ्या ठाकलेले पुण्यातील व्यापारी अभिनंदनास पात्र आहेत, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केलं. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावाच्या काळात तुर्कीएनं पाकिस्तानला समर्थन दिल्यानंतर पुण्यातील व्यापाऱ्यांनी तुर्कीएच्या सफरचंदांवर तसंच सुक्या मेव्यावर बहिष्कार टाकला असून अनेक व्यापाऱ्यांना धमक्या येत आहेत. त्या अनुषंगानं फडणवीस बोलत होते.

**नोंदणी रद्द**

भारतीय विमानतळांवर सेवा देणाऱ्या सेलेबी या तुर्की कंपनीचा सुरक्षा परवाना रद्द करण्याचा निर्णय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं घेतला आहे. राष्ट्रीय हिताचं रक्षण याला  सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असून त्यादृष्टीनं हा निर्णय झाल्याचं केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितलं. सेलेबी कंपनीची सुरक्षा मंजुरी रद्द करावी, अशी मागणी देशभरातून होत होती, असंही ते म्हणाले.

**करार रद्द**

भारत पाकिस्तान संघर्षादरम्यान पाकिस्तानच्या बाजूनं उभं राहणाऱ्या तुर्कीएसोबतचा सामंजस्य करार जवाहरलाल नेहरु विद्यापीठ अर्थात जेएनयूनं तसंच जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठानंही रद्द केला आहे. हैदराबाद इथल्या मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठानंही तुर्कीतील युनस इमर संस्थेशी केलेले शैक्षणिक सामंजस्य करार रद्द केले आहेत. अनेक पर्यटन कंपन्यांनीही तुर्कीए आणि अझरबैजानमधली नोंदणी रद्द केली आहे.

**उपराष्ट्रपती**

भारतानं दहशतवादावर अचूक वार करतानाच शांततेचा दृष्टिकोन कायम ठेवत जगापुढे एक नवा आदर्श ठेवला आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. दहशतवाद हा आता एका केवळ एखाद्या देशापुढचा नाही, तर जागतिक सुरक्षेसाठी धोका आहे; असं ते म्हणाले. जयपूरमध्ये भैरवसिंग शेखावत स्मृती पुस्तकालयाच्या उद्घाटन समारंभात ते काल बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने केवळ लष्करीच नाही तर राजनैतिक विजय देखील मिळवला आहे, असं त्यांनी सांगितलं.

**विकासदर**

संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालानुसार, भारत ही जगातील जलदगतीनं वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असून चालू आर्थिक वर्षात त्याचा विकासदर  सहा पूर्णांक तीन दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक आर्थिक स्थिती आणि शक्यता याविषयी तयार करण्यात आलेल्या मध्यवर्ती अहवालामध्ये हे निरीक्षण नोंदविण्यात आलं आहे. जागतिक अर्थव्यवस्था सध्या अस्थिर परिस्थितीचा सामना करत आहे. त्यामुळे यामध्ये काहीसा फरक होऊ शकतो, असं ही त्यामध्ये नमूद करण्यात आलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या वरिष्ठ अर्थतज्ञ इन्गो पिटरले यांच्या म्हणण्यानुसार, यामध्ये अपेक्षित असलेली वाढ ही खाजगी खरेदीदारी आणि सार्वजनिक गुंतवणुकीद्वारे होण्याची शक्यता आहे. या अहवालानुसार, भारताचा विकासदर पुढील वर्षी थोडा वाढून 6 पूर्णांक 4 दशांश टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. याउलट जागतिक विकासदर 2025 मध्ये फक्त 2 पूर्णांक 4 दशांश टक्क्यांपर्यंत राहण्याचा अंदाज आहे, व्यापार तणाव आणि धोरणात्मक अनिश्चितता यामुळे हा दर कमी राहणार आहे.

**दहशतवादी**

जम्मू आणि काश्मीरमध्ये पुलवामा जिल्ह्यात अवंतीपुरा भागातील नदेर त्राल परिसरात काल सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले. ही कारवाई काल सकाळी लवकर सुरू झाली. ती संध्याकाळपर्यन्त सुरू होती.

**अमित शहा**

छत्तीसगढ आणि तेलंगण सीमेवर करेगुट्टा जंगल आणि परिसरात राबविण्यात आलेल्या 21 दिवसांच्या नक्षलवादविरोधी मोहिमेदरम्यान जखमी झालेल्या सुरक्षादलाच्या कर्मचाऱ्यांवर नवी दिल्लीतील भारतीय आयुरविज्ञान संस्थेच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल या रुग्णालयात जाऊन या जखमी जवानांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

**रशिया-युक्रेन**

रशिया आणि युक्रेन दरम्यान आज इस्तंबूल इथं शांतता चर्चा होणार आहे. मात्र या चर्चेला आपण उपस्थित राहणार नसल्याचं युक्रेनचे राष्ट्रपती व्लादिमीर झेलेंस्की जाहीर केलं आहे. उभय देशांमधील तणाव कमी करण्यासाठी झेलेंस्की यांनी संरक्षणमंत्री रुस्तम उमेरोव यांच्या नेतृत्वाखाली एक प्रतिनिधी मंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. अंकारामध्ये संवादासाठी युक्रेन वचनबद्ध आहे, परंतु रशियाच्या हेतुबद्दल शंका असल्याचं झेलेंस्की यांनी म्हटलं आहे. मॉस्कोच्या प्रमुख निर्णय घेणाऱ्या प्रतिनिधींच्या अनुपस्थितीकडेही त्यांनी सर्वांचं लक्ष वेधलं असून अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो देखील या शांतता चर्चेत सहभागी होणार नाहीत, हेही अधोरेखित केलं आहे. जोपर्यंत अमेरिकेचे राष्ट्रपती  डोनाल्ड ट्रंप आणि रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन समोरासमोर भेटून चर्चा करत नाहीत तोपर्यंत कोणतीही प्रत्यक्ष प्रगती संभवत नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**नीरव मोदी**

पंजाब नॅशनल बँक गैरव्यवहारप्रकरणी तुरुंगात शिक्षा भोगत असलेला हिरे व्यापारी नीरव मोदी यानं आपला मामा मेहुल चोक्सीसोबत केलेला जामीन अर्ज लंडन उच्च न्यायालयानं काल फेटाळला. प्रत्यर्पणाच्या याचिकेवर निर्णय होईपर्यंत जामिनावर सुटका व्हावी यासाठी नीरव मोदीनं लंडनमधील न्यायालयात धाव घेतली. त्यानं दाखल केलेला हा जामीन अर्ज लंडनच्या किंग्ज बेंच डिव्हिजनच्या उच्च न्यायालयानं फेटाळून लावला. त्याच्या जामिनाच्या युक्तिवादाला क्राऊन प्रॉसिक्युशन सर्व्हिसच्या वकिलांनी कडाडून विरोध केला आणि त्यासाठी लंडनला गेलेल्या भारतीय तपास आणि विधी अधिकाऱ्यांच्या सीबीआय पथकानं  त्यांना चांगली मदत केली, असं सीबीआयनं दिल्लीत जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**खेलो इंडिया**

बिहारमध्ये झालेल्या सातव्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत महाराष्ट्राने 158 पदकांची कमाई करत पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावले आहे. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खेडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला विजेतेपदाचा करंडक देऊन गौरवण्यात आलं. महाराष्ट्र पथकाचे प्रमुख महादेव कासगावडे यांनी राज्याच्या सततच्या यशाचे श्रेय सरकारच्या भक्कम पाठिंब्याला आणि खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी सक्रिय दृष्टिकोनाला दिले. आकाशवाणीशी बोलताना ते म्हणाले....

**बहुत ही अच्छा कॉम्पिटिशन डिजाइन किया है। इसके लिए मैं साई को धन्यवाद देता हूं क्योंकि इंटरनेशनल प्लेयर्स के लिए एक अच्छा प्लेटफॉर्म इंडिया में बनाया है और ये खेलो इंडिया यूथ गेम्स जो है ये बहुत ही बढ़िया है। अभी कोई स्टेट्स में क्या है। प्राइज दे रहे हैं ऐसे बच्चों का और एक स्पोर्ट्स में भी करियर करने की संधि प्राप्त हो गई है और ये खेलो इंडिया गेम ऐसे ही दिन ब दिन बढ़ते जाए। हमारी इच्छा है। जिन्होंने जो यहां की सुविधा की और जो गेम्स ऑर्गनाइज किए बहुत ही बढ़िया।**

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.